# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

वाणिज्य विभाग, प्रकाशगड- ५वा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई.४०००५१.

फोन: (वै)२६४७४७५३ (का)२६४७४२११; फॅक्स २६४७२३६६


**पीआर-३/टॅरिफ /०२२५४** **दिनांक : १५/०१/२००६**

## परिपत्रक क्रमांक - १९

**विषय :- सप्टेंबर २००५ या महिन्यासाठी निर्धारित करण्यात आलेला व जानेवारी २००६ या महिन्याच्या वीज देयकात आकारावयाचा इंधन व इतर खर्च समायोजन आकार.**

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिनांक ३१.७.२००१ च्या निर्णयाद्वारे तसेच त्यानंतर दिलेल्या दिनांक २८.४.२००३ व ५.५.२००३ च्या निदेशान्वये इंधन व इतर खर्च समायोजन आकार निर्धारित करण्याबाबतची पध्दत व मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. सदर पध्दत व मार्गदर्शक तत्वाना अधीन राहून आणि सक्षम अधिकाऱ्यांनी, मान्यता दिल्यानुसार सर्व संबंधितांना असे कळविण्यात येते की, सप्टेंबर २००५ या महिन्यासाठी होणारा व जानेवारी २००६ या महिन्याच्या देयकात आकारण्यात येणारा इंधन व इतर खर्च समायोजन आकार **निरंक** समजण्यात यावा.

सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतात की, जानेवारी २००६ च्या विद्युत देयकात आकारावयाच्या इंधन व इतर खर्च समायोजन आकारासंबंधी आवश्यक नोंद घेण्यात यावी. संचालक (संचलन), यांनी पत्र **क्र.अअ/ विनिक /७३९ दि. ०९.०१.२००६** अन्वये याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागास यापुर्वीच सूचना दिल्या असून सदर पत्राची प्रत सर्व मुख्य अभियंता यांना देण्यात आलेली आहे.

**कार्यकारी संचालक -१ (वि. - वा. -समन्वय)**

**प्रत रवाना -**

१. मुख्य अभियंता, सर्व सं.व सु., परिमंडळे,

२. अधीक्षक अभियंता, सर्व सं.व सु., मंडळ कार्यालये,

३. कार्यकारी अभियंता, सर्व सं.व सु., विभागीय कार्यालये.

४. उप कार्यकारी अभियंते/सहाय्यक अभियंते, सर्व सं व सु., उप विभागीय कार्यालये.

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com